**विशेष दिवाणी दावा नं.६८/२०१२ मधील नि.३२० वरील आदेश**
**(सुर्यकांत आण्णासो सुतार विरुध्द शरद वसंतराव जाधव)**
**CNR No.MHSN020007952012**

१. प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी त्यांच्या तोंडी पुराव्यापूर्वी अन्य साक्षीदाराचा पुरावा देणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्र.६ हे त्यांचा मुलगा व मुलगी यांच्याकडे मे महिन्यापर्यंत अमेरिका येथे गेलेले आहेत. त्यामुळे त्यांचा पुरावा घेण्यापूर्वी प्रतिवादी क्र.५ ते ८ यांच्या व्यवहारातील साक्षीदार श्रीपाल आण्णासाहेब खेमलापूरे यांचा पुरावा प्रतिवादी क्र.५ व ६ यांच्या वतीने घेण्यास परवानगी मिळावी.

३. सदरहु अर्जाला अनुसरुन वादी यांनी नि.क्र.३२१ कडे त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे.

४. वादींच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा दावा हा मा. जिल्हा कोर्टाने Time Bond केलेला आहे. तसेच वादी यांनी दिनांक ३१/०१/२०२२ रोजी त्यांचा पुरावा संपल्याबाबत पुरसिस दिलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी हे जाणीवपूर्वक दावा चालविण्यास दिरंगाई करत असल्यामुळे त्यांनी प्रतिवादींचा अर्ज फेटाळण्याची मागणी केलेली आहे.

५. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी व वादी यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले.

६. सदरहु दावा हा १० वर्षे जुना आहे. वादी यांनी त्यांचा पुरावा दिनांक ३१/०१/२०२२ रोजी बंद केलेला आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिनांक १८/०२/२०२२ रोजी दिलेला होता. त्यांच्याच अर्जातील म्हणण्याचा विचार केला तर प्रतिवादी क्र.६ हे त्यांच्या मुलाकडे अमेरीकेला गेलेले होते व मे महिन्याअखेर पर्यंत

अमेरीकेत राहणार होते. सदरहु अर्जाच्या युक्तीवादा दरम्यान प्रतिवादी यांच्या वकीलांनी प्रतिवादी क्र.६ हे अमेरीकेतून आता भारतात आलेले आहेत असे स्वतः मान्य केलेले आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ अमेरीकेत असल्यामुळे दयावा लागला असल्यामुळे आता प्रतिवादी क्र.६ भारतात आल्याने त्यांच्या अर्जाचे कारण संपुष्ठात आलेले आहे. त्यामुळे प्रतिवादींचा अर्ज infructuous झाल्यामुळे तो फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब आदेश खालीलप्रमाणे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र.५ व ६ यांचा नि.क्र.३२० कडील अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.५ व ६ यांना असे निर्देशित करण्यात येते की, सदरहु दावा हा Time Bond असल्यामुळे प्रतिवादी क्र.५ किंवा प्रतिवादी क्र.६ यांनी सर्वप्रथम कोर्टात हजर राहून त्यांचा पुरावा जर त्यांना दयायचा असेल तर सादर करावा.

३. प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी या पुढे कोणत्याही सबबीवर सदर दावा प्रलंबित ठेवण्याचा प्रयत्न करु नये असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

४. सदरहु आदेशाची वादी व प्रतिवादी यांनी नोंद घ्यावी

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2022.06.23 12:35:33 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक – २१.०६.२०२२** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व.स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | - | २१.०६.२०२२ |
| पी.डी.एफ./अपलोडचा दिनांक- | | २३.०६.२०२२ |